वस्तु व सेवा कर भवन जालना
GST Bhavan Jalna

महाराष्ट्र शासन
वस्तु व सेवा कर विभाग

# ई–निविदा

०२ कंत्राटी सफाईगार यांची सेवा घेण्यासाठी ई- निविदा

## राज्यकर सहआयुक्त (नोडल)
## वस्तु व सेवा कर भवन, रेल्वेस्टेशन समोर, जालना विभाग, जालना.

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

## ई-निविदा फॉर्म भरावयाच्या सुचना

राज्य वस्तू व सेवाकर कार्यालय, रेल्वे स्टेशन समोर ,जालना या कार्यालयाच्या कार्यालयीन इमारतीमधील सर्व कक्ष, पाण्याच्या टाक्या, छन्नं मार्ग, दरवाजे ,खिडक्या, जिने, प्रसाधन गृहे, सांडपाणी मार्ग, भिंती, कार्यालयीन इमारतीभोवतालचा मोकळा परिसर, घनवन, बगीचा इत्यादीच्या स्वच्छता कामासाठीची कामगार आयुक्त यांनी निर्धारीत केलेल्या किमान वेतन कायद्यानुसार अनुषंगीक कामांची सेवा पुरविणाऱ्या महाराष्ट्रातील परवानाधारक / नोंदणीकृत / अनुभवी कंत्राटदाराकडून बाह्ययंत्रणेद्वारे **०२** कंत्राटी सफाईगार यांची सेवा घेण्यासाठी ई- निविदा मागविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन
राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना
वस्तू व सेवा कर भवन, रेल्वे स्टेशनसमोर, जालना-४३१२०३.
ई-मेल- eo.jalna@gmail.com / jalnajcst@gmail.com

क्र.रासआ (नोडल )/ कंत्राटी सफाईगार / साफसफाई ई-निविदा /२०२६-२७/ ब-३०७ जालना, दि १४.०५.२०२६

## ई- निविदा बाबत सुचना

## कार्यालयीन स्वच्छता विषयक कामाबाबत ई-निविदा २०२६-२७

राज्य वस्तू व सेवाकर कार्यालय, रेल्वे स्टेशन समोर ,जालना या कार्यालयाच्या कार्यालयीन इमारतीमधील सर्व कक्ष, पाण्याच्या टाक्या, छन्नं मार्ग, दरवाजे ,खिडक्या, जिने, प्रसाधन गृहे, सांडपाणी मार्ग, भिंती, कार्यालयीन इमारतीभोवतालचा मोकळा परिसर, घनवन, बगीचा इत्यादीच्या स्वच्छता कामासाठीची कामगार आयुक्त यांनी निर्धारीत केलेल्या किमान वेतन कायद्यानुसार अनुषंगीक कामांची सेवा पुरविणाऱ्या महाराष्ट्रातील परवानाधारक / नोंदणीकृत / अनुभवी कंत्राटदाराकडून बाह्ययंत्रणेद्वारे ०२ कंत्राटी सफाईगार यांची सेवा घेण्यासाठी ई- निविदा मागविण्यात येत आहे.

निविदेची सविस्तर माहीती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०५/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ उपलब्ध आहे. दिनांक २२/०५/२०२६ ला दुपारी ०३.३० वाजता याच संकेतस्थळावर तांत्रिक-लिफाफा उघडण्यात येईल.

### ई-निविदेचा कालावधी व वेळ खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचे स्वरूप | राज्य वस्तू व सेवाकर कार्यालय , जालना या कार्यालयाच्या कार्यालयीन इमारतीमधील सर्व कक्ष, पाण्याच्या टाक्या, छन्नं मार्ग, दरवाजे ,खिडक्या, जिने, प्रसाधन गृहे, सांडपाणी मार्ग, भिंती, कार्यालयीन इमारतीभोवतालचा मोकळा परिसर, घनवन, बगीचा इत्यादीची स्वच्छता राखणे करीता ०२ कंत्राटी सफाईगार यांची सेवा घेणे |
| 2 | कामाचा कालावधी | जून - २०२६ ते मे - २०२८ |
| 3 | निविदा अर्ज किंमत | रु. ५,७००/- |
| 4 | निविदा अर्ज सादर करावयाची तारीख व वेळ | दिनांक: १४/०५/२०२६ ते २१/०५/२०२६ (सायंकाळी ०६.०० पर्यंत) |
| 5 | निविदा बयाना रक्कम | रु. ९५,०००/- |
| 6 | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | दिनांक-२२/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता |
| 7 | सुरक्षा अनामत | रु. ७५०००/- |

**(मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल ) जालना विभाग, जालना यांच्या मान्यतेने.)**

अध्यक्ष ई-निविदा समिती तथा राज्यकर उपआयुक्त
वस्तू व सेवा कर भवन, जालना

महाराष्ट्र शासन

राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना

वस्तू व सेवा कर भवन, रेल्वे स्टेशनसमोर, जालना-४३१२०३.

ई-मेल- eo.jalna@gmail.com / jalnajcst@gmail.com

क्र.रासआ (नोडल )/ कंत्राटी सफाईगार / साफसफाई ई-निविदा /२०२६-२७/ ब- ३०४ जालना, दि १४.०५.२०२६

**पात्रतेसंबंधी निकष कंत्राटदार / पुरवठादार यांनी खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील.**

## निवीदा अटी व शर्ती – ( अ )

१. नमुद केलेल्या पात्रतेच्या निकषास पुर्ण करणाऱ्या निविदाधारकानेच फक्त काम करण्यासाठी अर्ज करावा व त्याने अधिकृत साक्षांकीत प्रती, कागदपत्रे, पुरावे, इ. http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून सादर करणे आवश्यक राहील. ज्या निविदा पात्रतेच्या निकषाला सोडून आलेल्या असतील त्या रद्द ठरविण्यात येतील व अशा निविदाधारकाला पुढील प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

२. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार सर्व नियम व अटी शर्ती या निविदेस लागु असतील. या शासन निर्णयाप्रमाणे निविदा शुल्क व बयाना (EMD) रक्कम सुट योग्य प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर लागु असेल.

३. सदर कामासाठी ई-निविदा फॉर्मची शुल्क रुपये रु.५,७००/- ( अक्षरी रुपये – पाच हजार सातशे रूपये फक्त) आणि निविदा बयाना (EMD) रक्कम रुपये रु. ९५,०००/- (अक्षरी रुपये- पंच्याण्णव हजार रुपये फक्त) राहील, सदर रक्कम उपलब्ध पर्यायाद्वारे ऑनलाईन पध्दतीद्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरण्यात यावी. तांत्रिक व वित्तीय लिफाफा याच संकेतस्थळावर भरण्यात यावे. ई-निविदा प्रकीया रद्द झाल्यास बयाना रक्कम परत करण्यात येईल परंतु निविदा शुल्क परत मिळणार नाही किंवा त्या संबंधीचा निर्णय मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना यांचा निर्णय अंतिम राहील. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

वस्तु व सेवा कर भवन जालना ★ GST Bhavan Jalna ★ सत्यमेव जयते

४. ई-निविदा मधील निविदा फॉर्म शुल्क व बयाना रक्कम ऑनलाईन स्वरुपात भरणे आवश्यक राहील.

५. कोणत्याही निविदा अंशतः किंवा पुर्णतः स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार हा मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना यांनी राखुन ठेवला आहे.

६. निविदाधारक हा नोंदणीकृत परवानाधारक असावा तसेच परवान्याचे नुतनीकरण केलेला असावा.

७. निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरल्याच्या पावत्यांची प्रत निविदेसोबत वेबसाईटवर अपलोड करावी.

८. निविदाधारकास सदर कंत्राटी सफाईगार यांची सेवा पुरविण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असावा व सदर प्रकारचे कामे चालू असल्याचा पुरावा सर्टिफीकेट किंवा दाखला सादर करणे आवश्यक राहिल.

९. निविदाधारकाच्या संस्थेची नोंदणी प्रमाणपत्राची सक्षम प्राधिकाऱ्याकडून मिळविलेली अधिकृत प्रत अपलोड करावी.

१०. काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र निविदेसोबत सादर करावे.

११. निविदाधारकाने त्यांचे वैयक्तीक नावाच्या / संस्थेच्या INCOME TAX चा परमानंट अकाउंटनंबर (PAN CARD) ची अधिकृत प्रत अपलोड करावी. मागील तीन वर्षाचे ( २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) प्राप्तीकर भरल्याचे विवरण पत्र निविदेसोबत http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करावीत.

१२. वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत (जीएसटी) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत अपलोड करावी तसेच त्याचा सदर नोंदणी दाखला रद्द झालेला नसावा. **मार्च २०२६ अखेरपर्यंत फॉर्म 3-B** भरलेला असणे आवश्यक तसेच वस्तू व सेवा कर देणे बाकी नसावे.

१३. संस्थेचे बँक पत प्रमाणपत्र रुपये ७५,०००/- एवढे निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहे.

१४. निविदाधारकाने संस्थेच्या नावाचे EPF (Employees' Provident Fund) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत अपलोड करावी.

१५. निविदाधारकाने संस्थेच्या नावाचे व्यवसायकर (PTRC व PTEC) नोंदणी प्रमाणपत्राच्या अधिकृत प्रत अपलोड करावी.

१६. व्यवसाय कर बाकी नसल्याचे प्रमाणित दाखला आवश्यक आहे. **संबंधित व्यवसायकर अधिकारी यांकडून सदर प्रमाणित व अद्यावत दाखला घेऊन जोडावा.**

१७. सहकारी संस्था/भागीदारी संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्या उपविधीची व नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करावे.

१८. भागीदारी व्यवसाय असेल तर भागीदारांची संमती व भागीदारी पत्र अपलोड करावीत.

१९. निविदाधारकाने ESIC (Employees' State Insurance Corporation) चे नोंदणी सर्टिफिकेट / नोंदणी अर्जाची प्रत अपलोड करावी.

२०. ना नफा, ना तोटा तत्वावर चालविण्यात येणारी सहकारी ग्राहक संस्था असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२१. निविदाधारकाने http://mahatenders.gov.in वर डिजीटल स्वाक्षरीच्या सहाय्याने नोंदणी केली असावी.

२२. दुकाने आणि व्यवसायिक संस्था अधिनियम १९४८ नुसार वैध नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आवश्यक आहे.

२३. सद्य:स्थितीत अश्या प्रकारचे काम करीत असल्यास त्या कामांची यादी किंवा केलेल्या करारनाम्याची प्रत.

२४. परिपुर्ण, खरी आणि सत्य माहिती असल्याबाबतचे विहित नमून्यातील रु.५००/- च्या बाँड पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२५. संबंधित संस्थेस राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांचे मार्फत काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे रु.५००/- च्या बाँड पेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२६. अटी व शर्ती मध्ये एखादी तरतुद रद्द करणे किंवा टाकणे यासबधीचा अंतिम निर्णय मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना यांचा असेल.

२७. कार्यालय प्रमुख व आस्थापना अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या स्वच्छतेविषयी दिलेल्या सुचनानुसार काम करणे बंधनकारक राहील.

वरील सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे स्व साक्षांकित केलेली आवश्यक असून त्यांची पुर्तता न झाल्यास निविदाधारकास अपात्र घोषित करण्यात येईल. तसेच मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी दोन दिवसात उपलब्ध करणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

निविदाधारकाने http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर बील ऑफ क्वांटीटी (.xls) मध्ये कंत्राटी सफाईगार सेवेचे सर्वसमावेशक दर हे प्रती व्यक्ती प्रती महिना नमुद करावेत.

(मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल ) जालना विभाग, जालना यांच्या मान्यतेने.)

अध्यक्ष ई-निविदा समिती तथा राज्यकर उपआयुक्त
वस्तू व सेवा कर भवन
जालना

पात्रतेसंबंधी निकष कंत्राटदार / पुरवठादार यांनी खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

## निवीदा अटी व शर्ती (ब )

१ नोंदणीकृत निविदाधारक यांची निविदा मंजूर झाल्यांनतर सात दिवसात संविदा सादर करणे व सुरक्षा अनामत भरणे आवश्यक असून त्यानंतरच कामाचा कार्यादेश देण्यात येईल.

२ कंत्राटदार हा जालना महानगरपालिका बाहेरील हद्दीतील असल्यास त्याला महानगरपालिका शहर हद्दीत आपला प्रतिनिधी नेमावा लागेल. स्वच्छते सेवेसंबंधी वेळोवेळी येणाऱ्या तक्रारी, अडचणी इत्यादीवर तात्काळ कार्यवाही करण्याची प्रथम जबाबदारी त्या प्रतिनिधीची व तद् नंतर कंत्राटदाराची असेल. त्या बाबतचा पत्रव्यवहार राज्य वस्तू व सेवा कर कार्यालय, जालना या प्रतिनिधी बरोबर करेल आणि त्या सर्व पत्रव्यवहारास कंत्राटदार जबाबदार असेल.

३ कंत्राटी सफाईगारांच्या मेहनतान्याची रक्कम लेखी मागणी केल्यानंतर जास्तीत जास्त 60 दिवसात अदा केली जाईल. राज्य वस्तू व सेवा कर कार्यालय, जालना कडुन काही तांत्रिक कारणास्तव मानधन देयक अदा करण्यास विलंब झाल्यास देयक रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज वा दंड कंत्राटदारास मागणी करता येणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास देयक रकमेवर कोणत्याही प्रकारचा अग्रीम राज्य वस्तू व सेवा कर कार्यालय, जालना कडून दिला जाणार नाही.

४ आवश्यकतेनुसार निविदेतील कामाचे तास, कामाचे स्वरुप, कामाची वारंवारता कमी करणे किंवा वाढविण्याचा अधिकार मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना यांना राहील.

५ निविदेत सहभागी निविदाधारकाने निवीदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

६ संस्था ज्या कंत्राटी सफाईगारांच्या मार्फत काम करून घेत आहे त्यांचा काही एक वाद निर्माण झाल्यास राज्य वस्तू व सेवा कर कार्यालय, जालना त्यास जबाबदार राहणार नाही.

७ ठेकेदाराने ई निविदेत नमुद केलेल्या कामाचा तपशील व त्या संबंधी सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.५०० च्या बाँड पेपरवर नोटरी केलेले शपथपत्र देणे आवश्यक राहील व सदर करारनाम्याचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

८ महाराष्ट्र कामगार आयुक्त विभागाकडील कामगार कायद्यानुसार किमान वेतन देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

९ **निविदाधारक / कंत्राटदार यांनी करार केल्यानंतर सर्व हेतू करीता कंत्राटदाराने पुरविलेल्या कामगाराच्या देय पगार, वर्गणी विविध कामगार कायदयातील तरतुदीप्रमाणे असेल जसे ईएसआय कायदा, कामगार भविष्य निधी कायदा, बोनस सानुग्रह अनुदान कायदा, घरभाडे भत्ता कायदा व इतर कायदेशीर पुर्तता या बद्दल कंत्राटदार जबाबदार असेल तसेच त्या रकमेमध्ये कराराची मुदत संपेपर्यंत कोणतीही वाढ / घट केली जाणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुनच निविदेमधील दर नमुद करण्यात यावेत.**

१० कंत्राटाचा कालावधी हा जून २०२६ ते मे २०२८ असा राहील व दर अकरा महिन्यांनी मुदतवाढ देण्यात येईल.

११ कंत्राटी पध्दतीने सफाईगाराचा करार हा सर्व खर्चासह दर्शविण्यात यावा.

१२ निविदा उघडण्यात आल्यानंतर दराबाबत वाटाघाटी करण्याचे अधिकार निविदा समिती जालना यांकडे राहतील.

१३ किमान वेतन कायद्यानुसार कर्मचा-यांना मिळणारे वेतन दर व त्यावरील सर्व्हिस चार्ज आधारभुत राहील. किमान वेतन कायद्यापेक्षा कमी दराने ई-निविदा पाठविल्यास तो अपात्र ठरविण्यात येईल.

## <u>नियम अटी व शर्ती – ( क)</u>

१ कंत्राटदारास संपूर्ण प्रशासकीय इमारत, मुख्य प्रवेशव्दार, व्हरांडा, कार्यालयातील सर्व खोल्या, पाण्याच्या टाक्या, छन्नं मार्ग, दरवाजे ,खिडक्या, जिने, प्रसाधन गृहे, सांडपाणी मार्ग, भिंती, भंडारगृह, घनवन, बगीचा, इमारतीच्या भोवती हिरवळ नसलेली उघडी जागा व हिरवळ असलेली जागा यांची सफाई करणे, त्यावरील झुडपे नष्ट करणे इत्यादी कामाकरिता **दोन सफाई कामगार** पुरवून त्यांच्या मार्फत **अनुसुची एक** मध्ये दर्शविल्या प्रमाणे स्वच्छता सफाई करण्याची हमी द्यावी लागेल.

२ जर सफाई कामगाराची संख्या, दीर्घ आजारपण, रजा बदली यामुळे **तरतुद एक** मध्ये दर्शविल्यापेक्षा कमी झाल्यास कंत्राटदार त्यांच्या स्वत:च्या खर्चाने विशिष्ट कर्मचारी ठेवण्याची जबाबदारी घेईल व त्या प्रमाणात त्यांच्या देयकातुन रक्कम वजा करण्यात येईल. आणखी असे की जर कंत्राटदार इतर काही कारणामुळे **अनुसुची एक** मध्ये दर्शविलेले कामे करण्यासाठी वरीलप्रमाणे स्वछता सफाई करण्याकरिता कामगार पुरविण्यास चुकल्यास हे कार्यालय इतर मार्गाने ते काम करुन घेण्यास स्वतंत्र असेल.

३ सर्व हेतु करीता कंत्राटदाराने पुरविलेल्या कामगाराच्या देय पगार, वर्गणी विविध कामगार कायदयातील तरतुदीप्रमाणे असेल जसे ईएसआय कायदा, कामगार भविष्य निधी कायदा, बोनस सानुग्रह अनुदान कायदा, घरभाडे भत्ता कायदा व इतर कायदेशीर पुर्तता या बदल कंत्राटदार जबाबदार असेल.

४ कंत्राटदाराने किंवा त्याने पुरविलेल्या सफाईगारांनी कार्यालयीन मालमत्तेचे नुकसान किंवा हानी केल्यास त्याबद्दल कार्यालयीन चौकशी केली जाईल व चौकशी नंतर कार्यालयाने ठरविलेली रक्कम कंत्राटदारास भरावी लागेल या बाबतचा अंतिम निर्णय मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांचा राहील.

५ दैनंदिन कामाबद्दलच्या सर्व सुचना या कार्यालयाने नामनिर्देशन केलेले प्रतिनिधी सफाई कामगारांना देतील.

६ कंत्राटदारांने सफाई कामासाठी लावलेले सर्व कर्मचारी कामावर असताना गणवेश नाव पट्टीसह असतील.

७ आवश्यक त्याप्रमाणे सर्व सफाई साहित्य व सामग्री कंत्राटदाराने या कार्यालयाच्या संमतीने खरेदी करुन पुरवावयाची आहे व या बाबत अतिरिक्त मोबदला कंत्राटदारास मिळणार नाही.

८ सफाई कामगाराच्या पर्यवेक्षणासाठी कंत्राटदाराने व्यवस्था करावयाची आहे.

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

९ कंत्राटदाराने या कार्यालयाच्या उपरोक्त लिखीत कामाकरीता नगरपालिका/स्थानिक संस्था/राज्याची व केंद्राच्या विविध खाते इ. कडुन जरुरी प्रमाणे स्वतःच्या खर्चाने परवाना / अधिकार पत्र मिळवायचे आहे व हे कार्यालय कुठल्याही प्रकारे त्याच्या नियमभंगास जबाबदार असणार नाही.

१० कंत्राटदार हा त्यांना लागणाऱ्या सर्व साधनांची काळजी घेण्यास जबाबदार असेल. वेळोवेळी साधनांच्या दुरुस्तीची कल्पना त्याने कार्यालय प्रमुखास दिली पाहिजे.

११ कंत्राटदार सर्व कार्यालयीन परिसर स्वच्छ राखण्यास जबाबदार असेल.

१२ कंत्राटदाराने वीज व पाणी यांचा वापर वाजवी ठेवला पाहीजे .जर त्यांचा वाजर गैरवाजवी केल्याचे दिसून आल्यास हे कार्यालय त्याबद्दल दंड लावण्याचा व आकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

१३ हा करार जून २०२६ ते मे २०२८ या कालावधीसाठी कायदेशीर राहील. कोणत्याही कारणाने करार रद्द झाल्यास कंत्राटदार हा कार्यालयाने पुरविलेली सर्व साहित्य परत करण्यास बांधील राहील.

१४ हा करार या कार्यालयाच्या लेखी संमती शिवाय कंत्राटदारास कोणालाही हस्तांतरीत/ स्वाधीन करता येणार नाही किंवा त्यात भागीदारी करता येणार नाही.

१५ कंत्राटदार यांनी केलेल्या किंवा न केलेल्या कृत्यामुळे उद्‌भवणाऱ्या सर्व कारवाई, दावे, नुकसान, आकारणी, मागणी, देणी या बाबत हे कार्यालय झळ सहन करणार नाही.

१६ करार कालावधीत कंत्राटदाराने साफ सफाईसाठी आवश्यक वस्तुंचा (शिडी,फिनाईल, झाडु , पोच्या, ॲसिड, डांबर गोळया व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक इतर साहित्य इ.) पुरवठा करणे आवश्यक आहे.

१७ कंत्राटदाराच्या कामामुळे या कार्यालयाच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास दोन्ही पक्षाची संयुक्त चौकशी होईल अशा चौकशीनंतर या कार्यालयाने ठरवलेली किंमत कंत्राटदाराला भरावी लागेल. या बाबतीत मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांचा निर्णय अंतिम राहील.

१८ कंत्राटदाराने दिलेल्या सर्व कामगारांनी कार्यालयाच्या परिसरात असताना सर्वसाधारण शिस्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. जर त्यांकडुन काही गैरवर्तन घडल्यास त्यास संपूर्णपणे कंत्राटदार जबाबदार राहील.

१९ सर्व साहीत्य व तत्सम वस्तू स्वच्छतेसाठी लागणाऱ्या सामुग्रीचा ताबा व त्याचा उपयोग, वापर करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२० शासनाच्या कोणत्याही देय करामध्ये वाढ झाल्यास हे कार्यालय वाढीव दर किंमत देणार नाही.

२१ या करारांबाबत किंवा करारासंबंधी काही वाद व मत भिन्नता असल्यास त्यांची कायदेशिस्ता जिल्हा व दिवाणी न्यायालयासाठी जालना जिल्हा न्याय क्षेत्र राहील. तसेच उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर खंडपीठ हे क्षेत्र राहील.

२२ जर कार्यालयाच्या स्थावर व जंगम मालमत्तेचे नुकसान दिसून आल्यास, त्या नुकसानाची भरपाई कंत्राटदार कडून वसूल केली जाईल. साफसफाईचे काम असमाधानकारक वाटल्यास केलेला करार ०७ दिवसाच्या आत नोटीस देऊन सदर करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल. या बाबतचा अंतिम निर्णय मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना विभाग जालना यांचा असेल. सदर बाब मान्य असल्याचे करारपत्रात कंत्राटदारास नोंदवावे लागेल.

२३ सफाईगार यांच्या उपस्थितीचा आढावा घेण्या करिता कार्यालयात हजेरीपट ठेवण्यात येईल. त्यावर सर्व संबंधिताना स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

२४ कंत्राटदार कामासाठी बाल कामगारांची नेमणूक करणार नाही.

२५ दिवसातून किमान दोन वेळा संपूर्ण कार्यालयीन साफसफाई करणे अनिवार्य राहील.

२६ सर्व सफाई कामगार यांना राष्ट्रीय सण व रविवार तसेच शासन निर्णयाप्रमाणे पाच दिवसीय आठवड्यानुसार शनिवार शिवाय इतर कोणत्याही सुट्टया लागू असणार नाही.

२७ केलेल्या साफसफाई कामाचा तपशिल दर्शविणारा तक्ता प्रत्येक आठवड्यास देणे कंत्राटदार यांना बंधनकारक असेल.

२८ कंत्राटदार हा त्यांच्या सर्व सफाई कामगाराची यादी सादर करेल तसेच त्यांची संपूर्ण माहीती आणि एक फोटो विहित नमुन्यात मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना विभाग जालना यांना सादर करेल व त्याबाबत हजेरीपट ठेवण्यात येईल.

२९ कंत्राटदार यांचे सर्व सफाई कामगार कार्यालयाच्या परिसरात असताना सर्वसाधारण शिस्तीचे पालन करतील. त्यांच्याकडून जर गैरवर्तन घडल्यास त्यास कंत्राटदार यांची सर्वस्वी जबाबदार राहील तसेच त्यांचे सर्व सफाई कामगार कार्यालयाच्या प्रवेशव्दारावर असणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्याकडून झडतीस पात्र असतील.

३० कंत्राटदार कडून पुरविण्यात येणाऱ्या सफाई कामगारांच्या जिवितास काही हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

३१ जर आजारपण, रजा/बदली इ. कारणाने सफाई कामगार गैरहजर राहिल्यास कंत्राटदार यांना त्यांच्या बदली दुसऱ्या कामगारांची व्यवस्था करावी. जर अशी बदली कामगारांची व्यवस्था केली नसेल तर अशा त्रुटीबद्दल त्या महिन्यात रु.५०००/- दंड आकारण्यात येईल तसेच त्याकरिता देण्यात येणारा मोबदला अशी एकूण रक्कम महिन्याच्या अदा करावयाच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

३२ कंत्राटदार यांनी देय कर परस्पर अदा करावयाचे आहे.

३३ वरील सर्व अटी व शर्तीचे पालन न केल्यास, करार रद्द करण्याचा आणि आवश्यकतेनुसार अटी व शर्तींमध्ये योग्य ते बदल करण्याचा, घट किंवा वाढ करण्याचा अधिकार मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना विभाग, जालना यांनी राखून ठेवलेला आहे.

३४ हा करार जून २०२६ ते मे २०२८ या कालावधी करीता असून साफसफाईच्या कामाचा दर्जा व गुणवत्ता पाहून दर ११ महीन्याच्या अंतराने हा करार नुतनीकृत करण्यात येईल.

३५ सफाई कामाचा तपशिल व वेळा खालीलप्रमाणे.

अ) कार्यालयातील पॅसेज, जिने, इमारतीच्या सभोवतालचा परिसर रोज स्वच्छ ठेवणे.

ब) कार्यालयातील दालने, बैठक व्यवस्था व आतील इतर परीसर डिटर्जंट पाण्याने/जंतूनाशकाने रोज सकाळी ०९:३० पूर्वी साफ करणे.

क) प्रसाधनगृहात पुरेसे डिटर्जेंट व फिनेल वापरून दिवसातून दोन वेळा सकाळी ०९:३० पूर्वी व दुपारी ०२:३० नंतर साफसफाई करणे आणि पुरेशा डांबरगोळ्या प्रसाधनगृहातील भांड्यात टाकणे व पुरेशा प्रमाणात हँडवॉश ठेवणे.

## अनुसूची क्रमांक -1

| अ.क्र. | तपशील | क्षेत्र | कधी |
|---|---|---|---|
| १ | कपाटे झाडणे व धुळ झटकणे | सर्व कार्यालयः | रोज |
| २ | झाडणे व औषधी बोळयाने फरशी पुसणे | अ) कार्यालयांतील सर्व कक्ष<br>ब) सर्व स्वच्छता गृहे. व प्रसाधन गृहे.<br>क) सर्व छन्नमार्ग<br>ड)टेबल, खुर्च्या, संगणक, टेलीफोन, कपाट, खिडक्या, इ. | रोज दोन वेळा |
| ३ | फडक्याने फरशी पुसणे | सर्व गॅलऱ्याः | रोज एक वेळा |
| ४ | कोळीष्ट काढणे | सर्व कार्यालय | १५ दिवसातुन एकदा |



वस्तु व सेवा कर भवन जालना सत्यमेव जयते GST Bhavan Jalna

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | परीसर झाडणे व परीसर स्वच्छ करणे तसेच लॉनची काळजी घेणे | संपूर्ण आवार | रोज |
| ६ | छत, फॅन व ट्यूब स्वच्छ करणे | दालनाच्या आतील परीसर व इमारतीच्या आतील व बाहेरील छतांची स्वच्छता. सर्व पंख्यांची स्वच्छता, खिडक्यांच्या काचा पुसणे. | १५ दिवसातुन एकदा |
| ७ | आवारातील बारीक गवत झुडपे काढणे | संपूर्ण आवार | महिन्यातून एकदा |
| ८ | गच्ची व पोर्च साफ करणे. | शीडीच्या सहाय्याने इमारत बाहेरुन स्वच्छ करणे | दर पंधरा दिवसांनी |
| ९ | इमरतीच्या सर्व काचा व खिडक्या आतुन बाहेरुन स्वच्छ करणे. | सर्व कार्यालय | दर पंधरा दिवसांनी |
| १० | इमारतीमधील सर्व संडास, बाथरुम व बेसिन तसेच सर्व डस्टबीन स्वच्छ करणे. | सर्व कार्यालय | दररोज |
| ११ | याव्यतिरिक्त स्वच्छता देखरेख समिती वेळोवेळी स्वच्छतेबाबत निश्चित करेल ती सर्व कामे | संपूर्ण कार्यालय व परिसर | आवश्यक असेल तेव्हा |
| १२ | तण काढणे, बागकाम, माळीकाम | बागेतील गार्डन मधील पूर्ण माळीकाम व इमारतीतील गवत, तण काढणे, पालापाचोळा स्वच्छ करणे, झाडांच्या फांदया काढणे, झाडांची छाटणी करणे. | आठवडयातून एकदा (सप्ताहातून एक वेळा) |
| १३ | पोछा मारणे स्वच्छता | सर्व पंखे व दिवे तसेच दिव्याभोवतीचा भाग. | पंधरवडातून एकदा (पाक्षिक) |
| १४ | तण काढणे, बागकाम, माळीकाम | झेंडा व झेंडयाभोवतीचा परीसर तसेच तेथील कुंडया. | राष्ट्रीय सण व इतर ध्वजारोहणाच्या प्रसंगी. |

(मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना यांच्या मान्यतेने.)

अध्यक्ष ई-निविदा समिती तथा राज्यकर उपआयुक्त
वस्तू व सेवा कर भवन
जालना

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

---

**पात्रतेसंबंधी निकष कंत्राटदार / पुरवठादार यांनी खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील.**

**नियम अटी व शर्ती (ड)**

**I) कामाची वेळ पर्यवेक्षण**

१ निविदा मध्ये नमूद केलेल्या कर्यालयीन इमारत व परिसर मनुष्यबळाचा वापर करून स्वच्छता साफ सफाई करण्याचे कामाचे स्वरुप, कामाची वारंवारता यानुसार किती तास प्रति दिन करावयाचे याचा अभ्यास कंत्राटदाराने करून त्याप्रमाणे मनुष्यबळाचे नियोजन लावावे. कोणताही ओव्हर टाईम दिला जाणार नाही.

२ कामाची वेळ गरजेनुसार व आवश्यकतेनुसार राहिल व वर्षाचे ३६५ दिवस कामाचे राहतील. नियमानुसार आठवडी सुट्टीचे नियोजन कंत्राटदाराने कार्यालयाशी चर्चा करुन करावे.

३ कंत्राटदाराने त्याचे कर्मचा-यांना लागणारे साहित्य, गणवेश, बुट, टोपी, मशिन्स, टुल्स व टॅकल्स, केमीकल्स, हात मोजे, ओळखपत्र इत्यादी पुरवठा करावयाचा असुन शर्ट वर संस्थेचे नांव एम्ब्रॉयडरी ने केलेले असावे.

४ ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्या निविदाधारकास सुरक्षा रक्कम ७५,०००/- ( अक्षरी – पंच्याहत्तर हजार रूपये फक्त ) जमा करावी लागेल. सुरक्षा अनामत रक्कम वर्ग झाल्याशिवाय कार्यादेश देता येणार नाही.

५ कंत्राटदाराचे मजूराने काम करतांना काही गैरवर्तन केल्यास, तसे लेखी कळविल्यास कंत्राटदाराने त्यास तात्काळ कामावरुन कमी करून त्याठिकाणी दुसरा मजूर पुरविणे बंधनकारक राहील.

**II ) दंड आकारणी :-**

१ कंत्राटदाराने महिन्याला केलेल्या कामाचा समाधानकारक अहवाल मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांना सही शिक्याने सादर करावयाचा असून सदर समाधानकारक कार्य अहवाल तक्ता सदर प्रशासनाकडून दिला जाईल. अहवाल समाधानकारक आढळुन न आल्यास रु.५००/- प्रति दिन दंडात्मक कार्यवाही होऊन नमूद केल्याप्रमाणे आकारणी संस्थेच्या बिलातून कमी केली जाईल. लेखी नोटीस दिल्यानंतर कामाचा दर्जा खालावणार नाही याची दखल संस्थेने घ्यावयाची आहे. करारातील अटी व शर्तीचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास एक महिन्याची नोटीस देऊन करार रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांनी राखुन ठेवले आहेत.

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

**III ) कामगार कायद्याचे पालन :-**

१ निविदाधारक मजूर लावताना त्यांचे वय १८ वर्षा पेक्षा कमी किवा ५८ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

२ निविदाधारक ज्या कामगारांची नियुक्ती केलेली असेल त्या कामगारांची नियुक्ती प्रचलीत किमान वेतन कायद्याप्रमाणे करेल तसेच त्यांचे EPF, ESIC, LEAVE, SALARY मासिक सुटी या प्रचलित कायद्याप्रमाणे राहतील. नियुक्तीच्या अटी / शर्ती कामगारास मान्य असल्याचे संमतीपत्र / करारपत्र करून घेईल व सदर मजूर / कामगार वस्तू व सेवा कर विभागाच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही अथवा वस्तू व सेवा कर विभागाच्या विरुध्द कोणत्याही प्राधिका-यापुढे / न्यायालयात दाद मागणार नाही असा स्पष्ट उल्लेख संमती पत्रात करारपत्रात करणे अनिवार्य राहिल.

३ ठेकेदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगार कर्मचा-यांचा भविष्यनिर्वाह निधी, व्यवसाय कर व राज्य कामगार विमा वर्गणी भरणे आवश्यक राहील. त्याचा पुरावा म्हणुन चलनाच्या छायांकित प्रती मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना या कार्यालयास सादर कराव्या लागतील.

**IV ) विमा व नुकसान भरपाई :-**

१ निविदाधारक नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना ओळख पत्र, गणवेश, बुट, टोपी, बेल्ट आवश्यक ती सुविधा पुरविणे ही निविदाधाराकाची जबाबदारी राहील तसेच हे निविदाधारकास बंधनकारक राहील. त्याचा दरमाह पुरावा सादर करावा लागेल. पुरावा सादर केल्यानंतर पुढील महिन्याचे देयक तयार केले जाईल. कराराअंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या सेवेच्या बाबतीत व किमान वेतनाच्या व इतर सर्व बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही निविदाधाराकाची राहील. साफसफाई, स्वच्छता करताना कर्मचा-याला / मजूराला काही एक दुखापत झाल्यास / अपघात झाल्यास त्यासाठी सदर कार्यालय जबाबदार राहणार नाही, कामगाराच्या संरक्षणाची जबाबदारी ही निविदाधारकाची राहिल. मजूरांना साप्तहिक सुटी देणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

२ कंत्राटी कामाच्या कालावधीतच ते काम करीत असलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधी कार्यालयाकडून उतरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील, विमा उतरविल्याचा पुरावा सादर न केल्यास कंत्राटी कामाची देय रक्कमेतून १०% रक्कम प्रत्येक महिन्याचे बिलातून कपात केली जाईल.

**V) वाद विवाद निर्माण कामी :-**

१ साफ सफाईची करावयाचे काम असमाधानकारक आहे असे दिसून आल्यावरून वाद निर्माण झाल्यास कोणतीही नोटीस न देता सर्व अनामत रक्कम जप्त करुन मक्ता / करार रद्द करण्याचा अधिकार मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

**VI ) न्यायालयीन कार्यक्षेत्र :-**

१ कायद्याबाबत वाद उद्भवल्यास त्याबाबत दाद मागण्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र जालना राहील. निविदाधारकाचा काही वाद निर्माण झाल्यास मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना हे लवाद म्हणून राहतील व त्यांचा निर्णय अंतिम / बंधनकारक राहील.

कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्याय प्रविष्ठ झाल्यास दोन्ही बाजुंचा खर्च निविदाधारकास करणे बंधनकारक असेल . जिल्हा व दिवाणी न्यायालयासाठी जालना जिल्हा न्याय क्षेत्र राहील. तसेच उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर खंडपीठ हे क्षेत्र राहील.

**VII ) निविदा ग्राहय कालावधी :-**

१ निविदा ऑफर ही निविदा उघडण्याचे नंतर १२० दिवसापर्यंत ग्राहय राहील.

**VIII ) निविदा शुल्क व इसार (EMD) रक्कम :-**

१ निविदा शुल्क रक्कम रु.५,७००/-(अक्षरी रुपये पाच हजार सातशे फक्त) व निविदा इसार रक्कम रु.९५,०००/- (अक्षरी रूपये पंच्यान्नव हजार फक्त) ऑनलाईन निविदा रक्कम राहील, सदर रक्कम उपलब्ध पर्यायाद्वारे ऑनलाईन पध्दतीद्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरण्यात यावी.

निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यास सुट असल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे. नसल्यास निविदाधारक हा प्रक्रियेतून कायमचा बाद होईल व अपात्र राहील.
ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्या निविदाधारकास सुरक्षा रक्कम ७५,०००/- ( अक्षरी – पंच्याहत्तर हजार रूपये फक्त ) जमा करावी लागेल. कराराची पुर्तता झाल्यानंतर सदर सिक्युरीटी डिपॉझीट निविदा धारकास परत केली जाईल. त्याचे कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

**IX) निविदा इसारा रकमेची जप्ती :-**

१ निविदाधारकाने काम मुदतपुर्व सोडून दिल्यास व ठेका रद्द केल्यास निविदा इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

**X ) सिक्युरीटी डिपॉझीट :-**

१ मंजूर निविदाधारकास पंच्याहत्तर हजार रूपये सिक्युरिटी डिपॉझीट बिनव्याजी देणे बंधनकारक राहील व सदर सिक्युरीटी डिपॉझीट हे करार कालावधी पर्यंत राज्य वस्तू व सेवा कर, जालना स्वच्छता

समितीकडे राहील. अटी व शर्तींचा भंग केला असल्यास सिक्युरीटी डिपॉझीट जप्त करण्याचे अधिकार मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल), जालना यांना राहील.

**XI ) कराराची रक्कम :-**

१ मक्तेदारास ठरलेल्या कामाचे मोबदल्यासाठी मागणी केलेल्या अर्जानंतर उपलब्ध अनुदानानुसार प्राधान्यक्रम देऊन देयक अदा केले जाईल.

(मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल ) जालना विभाग, जालना यांच्या मान्यतेने.)

अध्यक्ष ई-निविदा समिती तथा राज्यकर उपआयुक्त
वस्तू व सेवा कर भवन
जालना

वस्तु व सेवा कर भवन जालना
सत्यमेव जयते
GST Bhavan Jalna

( निविदाधारकाने रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपर वर करावयाचे प्रतिज्ञापत्र )

# प्रतिज्ञापत्र

नमुना क्रमांक एक

प्रति,

मा.राज्यकर सहआयुक्त (नोडल)
वस्तू व सेवा कर भवन,
जालना.

मी ------------------------------------------------ वय वर्ष ----------------------
राहणार ---------------------------------------------------------------------------
संस्थेचे नांव व पत्ता ---------------------------------------------------------------

सत्य प्रतिज्ञेवर वचन करतो / करते की,

१. मी / आम्ही खाली सहया करणार प्रतिज्ञेवर लिहून देतो की, माझे / आमचे जालना वस्तू व सेवा कर विभागातील कोणत्याही अधिकारी / कर्मचारी च्यासोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी, शेअर किंवा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संबंध मिळालेल्या कामात नाही. वर नमुद केलेली माहिती जर खोटी आढळल्यास मी / आम्ही सदर काम करण्याचा करार भंग केला असे समजून कोणत्याही क्षणी काम करीत असलेल्या कालावधी मध्ये अपात्र ठरू व आम्ही दिलेली निविदा इसार / सिक्युरीटी डीपॉझीट रुपये पंच्याहत्तर हजार वापस घेण्यास अपात्र राहू हे मला / आम्हाला मान्य आहे.

२. मी / आम्ही संस्थेचे दिवाळखोरी जाहीर केलेली नाही अथवा म्हणून घोषीत झालेली नाही.

३. मी / आम्ही अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. मी / आम्ही / संस्थेचे कोणतेही गैरकार्य करुन नैतीक अध: पतनाने कोणतेही कृत्य आमचेकडून कळत नकळत घडलेले / केलेले नाही.

५. माझे कडून / संस्थेकडून कोणतेही गुन्हेगारी कृत्य घडलेले नाही. तसेच उक्त कृत्यासाठी मी / आमच्या / संस्थेविरुध्द कोणतेही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

६. मी / आम्ही / संस्थेचे विरोधात आयकर / वस्तू व सेवा कर / फेमा इत्यादी कायद्यांचे उल्लंघन झालेले नाही / केलेले नाही.

७. मला/ आम्हाला / संस्थेला शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिका / महानगरपालिका या कार्यालयाने काळया यादीत टाकलेले नाही.

८. मला / आम्हाला / संस्थेला कामाचे स्वरुप व व्यक्ती करारामध्ये दिल्याप्रमाणे तसेच करारनामा अटी / शर्ती प्रमाणे कामाचा / स्वच्छता विषयक साहीत्य दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता/ करार रद्द केल्यास मी / आम्ही संस्था सदर ठिकाणी दुरूस्तीसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही हे मला मान्य आहे.

९. पात्रते बाबतचे दाखल केलेले कागदपत्र / माहिती सर्व खरे आहे. त्यात काही फसवेगिरी असल्यास मी / आम्ही त्यासाठी जबाबदार राहू व सदर करारास अपात्र ठरु शकतो याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदाधारकाचे नांव / सही / दिनांक

शिक्का

साक्षीदाराचे नाव / सही / दिनांक

शिक्का

## परिशिष्ट एक

## निविदाधारकाने द्यावयाचे स्वयंघोषणापत्र

आम्ही खालील सही करणार लिहून देतो की, मी / आम्ही नमुद करीतो की, निविदा शर्ती व अटींचा अभ्यास केलेला असून, सर्व समजले असून त्यासाठी बांधील राहून व निविदा कामासाठी नेमून दिलेल्या कामाच्या स्वरुपाप्रमाणे स्वच्छतेचे साहित्य यांचा विहित दिलेल्या अटी शर्तींना धरुन वापर करण्यास बांधील आहे/आहोत.

मी / आम्ही निविदा दस्त ऐवजाशी करारनामा असे पर्यंत बांधलेले आहोत त्यातील अटी शर्तीचे पालन करारनामा संपेपर्यंत करू.

मी / आम्ही डिमांड ड्राप्ट क्रं. ------------------------- दिनांक -------------------------

(नॅशनलाइज / शेडयुल ) बँकेचे नाव ------------------------------------------------------------- पत्ता ------
------------------------------------------------------------------------------------------रक्कम---------------
---------------------- पेई शाखा ----------------------------------------------

निविदा सहभागी होवून यशस्वी झाल्यास सदर निविदा इसारा रक्कम सिक्युरीटी डीपॉझीट मध्ये वर्ग करण्यास आमची हरकत नाही. जर निविदेतून काम मिळवण्यास अपयशी झाल्यास आमची निविदा रक्कम तीन महिन्यापर्यंत आपण आम्हास चेकने वापस करावयाची आहे हे आम्हास मान्य आहे.

आम्ही जर निविदा दस्तऐवजाप्रमाणे काम न केल्यास किंवा कामात कुचराई केल्यास किंवा कार्यालयीन स्वच्छता समिती संबंधात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हस्तक्षेप केल्यास किंवा आढळल्यास आमचे सिक्युरीटी डीपॉझीट जप्त केले जाणार आहे याची आम्हास पुर्ण माहिती आहे व त्यासाठी आमचे काही एक म्हणणे राहणार नाही.

सदर करारनामा उभयतांना मान्य असून बंधनकारक राहील. तसेच तुम्हाला दिली जाणारी कमीतकमी किंमतीची किंवा कोणत्याही रकमेची ऑफर तुम्ही स्विकारण्यास बंधनकारक नाहीत याची आम्हास जाणीव आहे व काही म्हणणे नाही. आम्ही सादर केलेले कागदपत्रे (पुरावे म्हणून) खरे आहेत. त्यात कोणतेही खोटे किंवा चुकीचे नाही.

जर तसे आढळल्यास आम्ही केव्हाही सदर करारातून काढून टाकल्या जावू शकतो व सिक्युरीटी डीपॉझीट मिळण्यास अपात्र राहू शकतो याची जाणीव आम्हाला आहे. सदर स्वयंघोषणापत्र पुर्ण जागरुकतेने व स्वइच्छेने लिहून दिले आहे.

निविदाधारकाचे नांव / सही / दिनांक

**(सदर स्वयंघोषणापत्र निविदा शुल्क व बयाना (EMD) रक्कम सुट लागु असलेल्या निविदाधारक यांनीही द्यावयाचे आहे. स्वयंघोषणापत्र सादर न केल्यास निविदा अपात्र राहील.)**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
राज्यकर सहआयुक्त (नोडल) जालना विभाग, जालना
वस्तू व सेवा कर भवन, रेल्वे स्टेशनसमोर, जालना-४३१२०३.
ई-मेल- eo.jalna@gmail.com / jalnajcst@gmail.com

---

क्र.रासआ (नोडल )/ कंत्राटी सफाईगार / साफसफाई ई-निविदा /२०२६-२७/ ब-          जालना, दि

| अ.क्र. | घटनाक्रम तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर निविदा प्रकाशित करणे. | दिनांक - १४/०५/२०२६ | सकाळी - ११.०० |
| २. | संकेतस्थळावरील निविदा प्राप्त करणे | दिनांक - २१/०५/२०२६ | सायंकाळी - ६.०० |
| ३. | संकेतस्थळावरील प्राप्त निविदा उघडणे. | दिनांक - २२/०५/२०२६ | दुपारी - ०३.३० |

महत्वाच्या सुचना :-

१. सर्व इच्छुक निविदाधारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई- निविदा प्रणालीचा http://mahaenders.gov.in या पोर्टलवर Enroll करणे आवश्यक आहे.

२. निविदा फॉर्म शुल्क व बयाना रक्कम उपलब्ध पर्यायाद्वारे ऑनलाईन पध्दतीद्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरण्यात यावी.

३. सर्व इच्छुक निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, सदर निविदेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यात येईल. काही तांत्रीक आडचणी उदभवल्यास वेबसाईटवरील मदत केंद्रावर संपर्क करावा. इंटरनेट, विद्युत पुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

**(मा. राज्यकर सहआयुक्त (नोडल ) जालना विभाग, जालना यांच्या मान्यतेने.)**

अध्यक्ष निविदा समिती तथा राज्यकर उपआयुक्त
वस्तू व सेवा कर भवन
जालना.



Signature Not Verified
Digitally signed by SANDIP VIJAYKUMAR GHOGE
Date: 2026.05.14 15:58:51 IST
Location: Maharashtra-MH